भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. १४२ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/०३/२०१८

**१) किराणा दुकानातील चिल्लर पैश्याची चोरी :–**

दिंनाक १७/०३/२०१८ चे २२.०० ते दि. १८/०३/२०१८चे ०६.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी दिलीप झींगर बानेवार वय ४४ वर्ष रा. खातरोड भंडारा यांचे किराणा दुकानाचे कोणीतरी अज्ञात चोराने रात्रीचे वेळी शटरचे ताले तोडुन आत प्रवेश करून प्लास्टीकचे डब्यामधील चिल्लर ४,५००/रु. व कापडाचे पिशवी मधील चिल्लर ७,०००/रु. असा एकुन ११,५००/रु. रक्कम चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) बांधकामातील लोहयाची चोरी :–**

दिंनाक १५/०३/२०१८ चे २२.३० ते १६/०३/२०१८ चे ०६.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सौ. मालताबाई विनायक सिंगाडे वय ५० वर्ष रा. डोडमाझरी यांचे घराचे नविन बांधकामा करीता खरेदी केलेला लोहा प्लॉट समोर ठेवलेला ८ एमएम ७० किलोचा १ बंडल कि. २८६०/रु. चा लोहा कोणीतरी अज्ञात चोराने कुनीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने, फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**३) टाटा वाहनाच्या धडकेत एक जखमी :–**

दिंनाक १७/०३/२०१८ चे २२.०० वाजता दरम्यान यातील आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील टाटा सुमो भरधाव वेगाने व लापरवाहीने चालवुन ओव्हरटेक करतांना त्याचे समोरील रेनाल्ड क्विड गाडी क्र. एमएच ३६ झेड २२९४ ला मागेहुन धडक मारल्याने फिर्यादीचे वाहनाचा मागील व पुढील भाग चेपकुन आत बसलेल्या फिर्यादीला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे यांचे तोंडी व डॉ.रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**४) दारूच्या नशेत महिलेकडे बघुन अश्लिल हावभाव केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिंनाक १८/०३/२०१८ चे १२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी महिला ही घरा समोर अंगणात घरघुती काम करीत असतांना, तीच्या घरासमोर राहणारा यातील आरोपी हा दारूचे नशेत उघडयावर लघवी करीत असतांना फिर्यादी कडे बघुन अश्लिल हावभाव केल्याने, तसेच आरोपीचा दारू पिल्याबाबत डॉ. अहवाला वरून व फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ५०९ भादवी. सहकलम ८५(१) मदाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. चौधरी पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**५) अवैध हातभट्टी दारु अडड्यांवर धाडी .  :–**

दिनांक १८/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, जवाहरनगर,तुमसर लाखनी व अडयाळ येथे अवैध हातभट्टी दारु धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १६९ लिटर हातभट्टी दारु + १४४० किलो सडवामोहा + साहीत्य कि ८३३३५/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १८/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनाकरीता ११ ईतर वाहनांवरती – ६५ केसेस करण्यात आले आहे

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
महिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.